नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 06/07/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

# खापरखेडा येथे देशी माउझर पिस्टल सह आरोपी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामिण ची कारवाई

आज रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामिण येथील पथकास मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे पोस्टे खापारखेडा हद्दीतील मिलन चौक येथील पुजा बार समोर पांढरा शर्ट व लोअर घातलेल्या एका इसमाकडे अवैद्यरित्या हॅन्डमेड बनविलेला माउझर पिस्टल आहे. अशी खात्रीशीर माहिती वरुन मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे आदेशावरुन पो.नि. श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात त्यांचे विशेष पथकाने सापळा रचुन नमुद इसमास ताब्यात घेवून त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव विजय कुमार उर्फ रामफल मदनप्रसाद वया 36 वर्षे रा. सिल्लेवाडा असे सांगितले. पथकांनी त्याचे अंग झडतीचे कारण सांगुन त्यांचे अंगझडती घेतली असता, त्याचे नेसलेल्या लोअर च्या कमरेच्या उजव्या भागात एक लोखंडी हॅन्डमेड माउझर पिस्टल त्यामध्ये तिन जिवंत काडतुस लोड असलेला मिळुन आले. ते पथकाने पंचासमक्ष मौक्यावर जप्ती पंचनाम्या प्रमाणे जप्त करुन माउझर पिस्टल व नमुद आरोपी पुढील कायदेशीर कारवाई करीता पोस्टे खापरखेडा चे स्वाधीन केले. यामध्ये आरोपी विरुध्द कलम 3/25 भारतिय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत असुन, पुढील तपास पोस्टे खापरखेडा करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामिण श्री. राकेश ओला, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. पो.नि. श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सपोनि श्री. अनिल राउत, सहा. फौजदार लक्ष्मीप्रसाद दुबे, पो.हवा. विनोद काळे, ना.पो.कॉ. शैलेश यादव, अरविंद भगत, सत्यशिल कोठारे, पो.कॉ. विरेंद्र नरड, प्रणयसिंग बनाफर, चासफौ साहेबराव बहाळे सर्व स्थागुशा ना.ग्रा. यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर